लोकमत

# विद्यापीठात आज बेसिक लाइफ सपोर्ट प्रात्यक्षिक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतीय बालरोगतज्ज्ञ संघटना आणि कोल्हापूर बालरोगतज्ज्ञ संघटनेतर्फे दि.१७ जुलैपासून जीवन संजीवनी सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्याच्या अखेरच्या दिवशी आज रविवारी (दि.२४) सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर प्रात्यक्षिके सादर केली जाणार आहेत. या सप्तहात सर्वसामान्य लोकांना एखादी व्यक्ती अचानक कोसळली किंवा हृदय बंद झाले, यावेळी काय करायचे, याचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकांसह शिकवण्यात आले. त्यात शिवाजी विद्यापीठातील सुरक्षारक्षक, फिरायला येणारे नागरिक, पोलीस, आरटीओ, महापालिका, रेस्क्यू फोर्स, जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी, सीपीआर हॉस्पिटलमधील प्रशिक्षणार्थी नर्सेस, बाचणी (ता. कागल) येथील महाविद्यालयीन विद्यार्थी, आदींना मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. नरेंद्र नानिवडेकर, निवेदिता पाटील, आदींनी मार्गदर्शन केले.

पुण्यनगरी

# 'नॅनोसायन्स 'बाबत २७ पासून व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथील 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी' अधिविभागातर्फे 'नॅनोसायन्स आणि नॅनोटेक्नॉलॉजी क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर मोफत ऑनलाईन व्याख्यानमालिकेचे आयोजन करण्यात येत आहे. ही व्याख्यानमाला दि. २७ ते ३० जुलै या कालावधीत दुपारी १२ ते १ या वेळेत होणार आहे. ही व्याख्यानमालिका प्रामुख्याने १२ वी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या पालकांसाठी आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभागाचे प्रभारी संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.



24 JUL 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील भव्य अश्वारूढ पुतळा

शिल्पसौंदर्य

- अजय दळवी

कोल्हापुरातील छत्रपती शिवरायांचा सर्वांत मोठा पुतळा कोणता असेल तर तो शिवाजी विद्यापीठात असणारा अश्वारूढ पुतळा. साधारण १५ ते १६ फूट उंचीचा असा हा पुतळा अत्यंत आवेशपूर्ण आणि अश्वाच्या गतीवरील महाराजांचे पूर्ण नियंत्रण दर्शवते. अश्वारूढ शिवराय त्यांच्या वाटचालीमधील विजयाच्या उत्तुंग अवस्थेत उंच कड्यावर उभारल्याचा भास येथे होतो. उजवा पाय अगदी टोकाला थांबवलेल्या अवस्थेत आहे. शिवरायांनी घोड्याचा ओढलेला लगाम आणि तत्क्षणी थांबलेला घोडा अशी चित्तथरारक रचना या पुतळ्याची आहे.

प्रसिद्ध शिल्पकार बी. आर. खेडकर यांनी हा पुतळा बनवला असून त्यांनी आपलं कसब पणाला लावलेले दिसते. घोडा आणि घोड्यावर बसलेली व्यक्ती यांचे एक विशिष्ट नाते असते, ते येथे अनुभवता येते.



वेगाबरोबरच आपल्याला हवा तसा घोडा नियंत्रित करणे हे फार मोठे कसब दर्शवून महाराजांची स्वतःच्या मनावरील पकड या शिल्पाच्या रचनात्मक क्षणात शिल्पकारांनी शिल्पांकित केल्याचे आपण अनुभवू शकतो.

या शिल्पातली शिवरायांची प्रतिमा ही समाजमनामध्ये परंपरेने जोपासली गेलेल्या पारंपरिक कल्पनेप्रमाणे घडवली आहे. डाव्या हातात खेचलेला लगाम, उजव्या हातात तलवार, उठावदार चेहरा आणि बलदंड शरीरयष्टी असे शिवरायांचे व्यक्तिमत्त्व या शिल्पात आहे. घोड्याचे पिळदार स्नायू, त्याचे तगडे पाय, लगाम खेचल्यावर वळलेली मान आणि पाय रेटत थांबलेला घोडा. घोड्याच्या शरीरशास्त्राचा सुंदर अभ्यास त्यात दिसतो. घोड्याचा रेटलेला उजवा पाय आणि शिवरायांचे रिकिबीमधले पाय हे एकाच अँगलमध्ये असून घोडा ज्या गतीमध्ये थांबला आहे, तो विशेष क्षण या शिल्पात टिपलेला दिसतो. महाराजांचे घोड्यावरील पूर्ण नियंत्रण हे अनेक अर्थांनी प्रतिकात्मक ठरेल अशा पद्धतीने शिल्पकारांनी योजले आहे. घोड्याच्या शेपटीचे केस समोरील बाजूस झुकलेले असून यावरून घोड्याची गती आणि थांबण्याची स्थिती लक्षात येते. महाराजांचे कपडे, त्याच्या पडलेल्या घड्या यांचे उत्कृष्ट शिल्पांकन या शिल्पात आहे. बी. आर. खेडकर यांची काम करायची विशिष्ट शैली, कपड्याचे उठावदार फोल्ड, दागिन्यांचे आणि इतर कलाकुसरीचे एकूणच काम पारंपरिक असून ते या शिल्पाला पूर्णत्वास नेते.